NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE
नागपूर शहर पोलीस आयुक्तालय
(पोलीस वार्तापत्र)
दुपार

**दिनांक १२.०४.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ११.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून एकुण ७,७८०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. महा. जुगार कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण २०,३८०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,०१६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,११,२००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— आय.पी.एल. क्रिकेट सामन्यावर जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०४.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, आयटी पार्कजवळ, लोखंडे नगर, सिध्दांत सक्षम अपार्टमेंट, चवथा माळा, फ्लॅट क्र. ४०१ येथे काही ईसम चेन्नई विरूध्द दिल्ली, टी—२०, आय.पी.एल. या लाईव्ह क्रिकेट सामन्यावर मोबाईल फोन द्वारे लागवडी—खायवाडी करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष जावुन, सापळा रचुन, रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) अमन परमानंद पाठक वय २६ वर्षे, रा. गणपती नगर, गोधनी रोड, मानकापूर २) आकाश जयंती गुहील वय २७ वर्षे, रा. ए विंग, ३०४, सुजाता शॉपिंग सेंटर, भाईंदर, पुर्व मुंबई ३) श्रेयस सप्तऋषी लांजेवार वय २१ वर्षे, रा. रिपब्लीकन नगर, श्रावस्ती बुध्द विहाराजवळ, नागपूर ४) मुशीर अहमद मतीन अहमद वय २२ वर्षे, रा. नवा नकाशा, लष्करीबाग, पाचपावली, नागपूर हे पाहिजे आरोपी एस.के. नावाचा इसम याचेसोबत संगनमताने प्रतिबंधीत लिंक तयार करुन समक्ष लाइव्ह क्रिकेट सामन्यावर लोकांना ऑनलाईन मोबाईल फोन व लिंकद्वारे युजरआयडी व पासवर्ड देऊन, भाडोत्री बॅक खात्यांचा वापर करुन, शासनाचा कर बुडवून, शासनाची फसवणूक करून, ऑनलाईन जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन वेगवेगळ्या कंपनीचे ११ मोबाईल फोन तसेच, वेगवेगळया बॅकांचे ११ पासबुक असा एकुण किंमती ३,९२,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता लाईव्ह क्रिकेट सामन्यावर खायवडी—लागवडी करून ऑनलाईन जुगार खेळतांना मिळून आल्याने व त्यांनी शासनाची फसवणूक केल्याने आरोपींविरूध्द पोलीस ठाणे प्रतापनगर येथे कलम ३३६(३),३४०(२),३१८(२),६१(२) भा.न्या.सं. सहकलम ४, ५, म.जु.का.

सहकलम ६६(ड) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह प्रतापनगर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली मपोनि. शुभांगी देशमुख, पोउपनि. सपोनि गजानन चांभारे, पोहवा महेंद्र सडमाके, संतोष चौधरी, संदीप पांडे यांनी केली.

**३) गुन्हेशाखा, खंडणी विरोधी पथकाची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ११.०४.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, देवी नगर, नारा, जरीपटका येथे राहणारा आरोपी रोशन उपासराव तडेकर वय ३७ वर्ष याचे घरी पंचासमक्ष पाहणी केली असता, त्याचे ताब्यात शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा वेगवेगळे फ्लेवरचे तंबाखु, पानमसाला, तंबाखु पाऊच असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन विमल, रजनीगंधा, ईत्यादी सुगंधीत तंबाखु व पानमसाल्याचे पाकीटे किंमती अंदाजे २७,७८५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी अमरनाथ सोनटक्के यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे कलम १२३,२२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),२६(२) अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. रविंद्र नाईकवाड व त्यांचे पथकाने यांनी केली.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे लकडगंज :— आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, फ्लॅट क्र. ३०३,३०२, बी विंग, मोखारे पॅलेस, दानागंज चौक, नागपूर येथे राहणारी फिर्यादीची बहिण नामे कु. गायत्री उर्फ गौरी राजेंद्र बन्सोड वय २८ वर्षे, हिने दिनांक ०४.०४. २०२६ चे ०२.०० वा. ते ०३.०० वा. चे दरम्यान राहते फ्लॅटमध्ये सिलींगचे फॅनला ओढणीने गळफास घेवुन आत्महत्या केली होती. पोलीस ठाणे लकडगंज येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीत तसेच फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार मृतक हिचे आरोपी रितेश राजकुमार वांदीले वय

२६ वर्ष रा. प्लॉट क्र. २२, बहिणाबाई नगर, परसोडी, उमरेड याचेसोबत प्रेमसंबंध होते. मृतक ही एअर होस्टेस असल्याने शॉर्ट कपडे घालते या कारणावरुन 'तु शॉर्ट कपडे घालायचे नाही' असे म्हणून नेहमी त्रास देऊन लग्न न करण्याची धमकी देत होता. या कारणावरुन त्यांचेमध्ये नेहमी वादविवाद होत होता. तसेच आरोपीने फिर्यादीचे मोबाईल मधील व्हिडीओत तिचे आई वडील व नातेवाईकांना अपमानास्पद बोलला. तसेच वादविवाद करून अपमानास्पद वागणूक देवुन लग्नास नकार दिला. फिर्यादीचे बहिणीने आरोपीचे त्रासाला कंटाळून गळफास घेवून आत्महत्या केली. आरोपीं याने मृतक हिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

यापकरणी पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. संदीप शिंदे ९८५०३४८७६३ यांनी आरोपीविरूध्द कलम १०८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाठोडा:— चोरी करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. ६, आराधना नगर, बस स्टॉपमागे, फिर्यादीचे जावई राजन इंगोले यांचे हॉस्पिटलचे बांधकाम सुरु आहे. नमुद ठिकाणी मेडीकल ग्रेड कॉपर पाईपचे तीन बंडल पाईप ठेवलेले होते. दिनांक १०.०४.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, दोन अनोळखी इसमांनी घटनास्थळी येऊन चौकीदाराचे पत्नीला ठेकेदार यांची नावे सांगून त्यांनी कॉपर पाईपचे तीन बंडल खराब असल्याने परत घेऊन जाण्यास सांगितलेले आहे अशी बतावणी करुन, एका टाटा एस गाडीमध्ये कॉपर पाईपचे तीन बंडल कि. २,९८,५४०/— चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी डॉ. कृष्णा परसराम शहाणे वय ६८ वर्ष रा. १६६, गणेशनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. गायकवाड ९९७०८७३५७७ यांनी अज्ञात दोन आरोपींविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**